# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

इंद्रभुवन, आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर-413001.

## सामान्य प्रशासन विभाग

---

जा.क्र.सआस/कक्ष-1/आस्था-7/ दि. /08/2024.

## -: जाहिरात प्रसिध्दीकरण :-

सोलापूर महानगरपालिका सोलापूर यांचे मार्फत शिकाऊ उमेदवार कायदा 1961 अंतर्गत सोलापूर महानगरपालिकेमध्ये सन २०२४- २०२५ चे सत्राकरिता शासन मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थांकडुन खालील तक्यात नमुद पदाकरीता १ वर्षाच्या विहीत प्रशिक्षण कालावधीसाठी, शासन निर्णयानुसार मासिक विद्या वेतन (Stipend) तत्वावर अर्ज मागविण्यात येत असुन त्याकरीता दि. १२/०८/२०२४ ते दि. २६/०८/२०२४ अखेर . https://www.apprenticeshipindia.gov.in/ प्रणाली मध्ये इच्छुक विद्यार्थांनी आपला अर्ज भरावयाचा आहे.

| अ.क्र. | व्यवसाय ट्रेडचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | इलेक्ट्रीशियन | ५ | शासन मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून इलेक्ट्रीशियन कोर्स उत्तीर्ण |
| २ | वायरमन | ५ | शासन मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून वायरमन कोर्स उत्तीर्ण |
| ३ | पंप ऑपरेटर | ९ | शासन मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून पंप ऑपरेटर कोर्स उत्तीर्ण |
| ४ | संगणक ऑपरेटर | ५ | शासन मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून संगणक ऑपरेटर कोर्स उत्तीर्ण |
| ५ | मेसन/गवंडी | १ | शासन मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून मेसन/गवंडी कोर्स उत्तीर्ण |
| ६ | मोटार मॅकनिक | १ | शासन मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून मोटार मॅकनिक कोर्स उत्तीर्ण |
| ७ | सुतार | २ | शासन मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून सुतार कोर्स उत्तीर्ण |
| ८ | प्लंबर | १२ | शासन मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून प्लंबर कोर्स उत्तीर्ण |
| | एकुण----------- | ४० | |

**अर्ज करणाऱ्या उमेदवारांकरिता खालील शर्ती व अटी बंधनकारक राहतील.**

१) वरील ट्रेड नुसार दि. १२/०८/२०२४ ते दि.२६/०८/२०२४ अखेर https://www.apprenticeshipindia.gov.in/ प्रणाली मध्ये अर्ज भरावयाचा आहे प्रणाली मधील दि. १२/०८/२०२४ पुर्वीच्या भरलेल्या अर्जांचा तसेच दि. २६/०८/२०२४ नंतर भरलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

Scanned with OKEN Scanner

२) सदरच्या नेमणुका ह्या फक्त शिकाऊ उमेदवार/शिक्षणार्थी म्हणून विहीत कालावधीसाठी शासन निर्णयानुसार देय असलेल्या विद्यावेतनावर आहेत. प्रशिक्षण कालावधी पूर्ण झाल्यानंतर नेमणूक संपुष्टात येईल. व्यावसायिक पदावरील शिकाऊ उमेदवाराचा महानगरपालिका आस्थापनेवर कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.

३) शासन निर्णयानुसार इलेक्ट्रीशियन, वायरमन व मोटर मेकॅनिक या ट्रेडच्या शिकाऊ उमेदवारांना विद्यावेतन म्हणून दरमहा र.रु.११७००/- इतके, पंप ऑपरेटर, संगणक ऑपरेटर, मेसन/गवंडी, सुतार, प्लंबर या उमेदवारांना र.रु.१०४००/- इतके विद्यावेतन अदा करणेत येईल.

४) शिकाऊ उमेदवारांना नियुक्ती आदेशातील नमुद खात्यामध्येच काम करणेबंधनकारक राहील खाते/विभाग बदल करणेबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव तंत्राचा वापर केल्यास आपली नियुक्ती तात्काळ संपुष्ठात आणण्यात येईल.

५) प्रशिक्षण कालावधीत उमेदवाराची गैरहजेरी व गैरवर्तणूक आढळून आल्यास त्यांस कोणतीही पूर्वसुचना अथवा नोटिस न देता प्रशिक्षणार्थी पदावरुन कमी केले जाईल तसेच कोणताही मोबदला दिला जाणार नाही.

६) मेरीट लिस्ट नुसार विद्यार्थांची निवड करण्यात येईल. विद्यार्थांकडुन अर्धवट किंवा अपुर्ण अर्ज भरल्यास विद्यार्थांचा अर्ज नाकारला गेल्यास अथवा अपात्र ठरला गेल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यार्थांची राहिल. याबाबत विद्यार्थांकडुन कोणत्याही प्रकारची तक्रार स्विकारली जाणार नाही.

६) वर नमुद केलेल्या अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार व भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांनी राखुन ठेवलेला आहे.

(आशिष सुमन सुधाकरराव लोकरे)
उपायुक्त
सामान्य प्रशासन विभाग
सोलापूर महानगरपालिका.

Scanned with OKEN Scanner